**प्रेसनोट                    दिनांक:- ०३/०७/२०१९.**

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.

## घरफोडीच्या गुन्हयातील दोन विधी संघर्षित बालके पोलीसांच्या ताब्यात

फिर्यादी श्री. भवरलाल कचलानंद राठी, वय-४८ वर्षे, रा. लक्ष्मीपार्क,राजेंद्रनगर, पुणे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांचे माताजी मेडीकल, सेनादत्त पेठ,पुणे हे मेडीकलचे दुकान दिनांक-२८/०६/२०१९ रोजी रात्रौ २२-४५ ते दिनांक-२९/०६/२०१९ रोजी सकाळी ०९-१५ वा.चे दरम्यान बंद असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयांनी त्यांचे दुकानाचे छतावर चढुन वरील बाजुस असलेल्या मोकळया जागेतुन प्रवेश करुन दुकानातील १,०७,०००/-रुपये रोख रक्कम व १२,०००/-रुपये किंमतीचा डी.व्ही.आर. असा एकुण १,१९,०००/-रुपये किंमतीचा माल घरफोडी चोरी करुन चोरुन नेलेबाबत विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणे शहर,गुन्हा नोंद क्रमांक-२५०/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे दिनांक-२९/०६/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यांत आलेला होता.

वर नमुद दाखल गुन्हयाचे तपासा दरम्यान दिनांक-०१/०७/२०१९ रोजी विश्रामबाग पोलीस ठाण्याचे तपास पथकातील पोलीस शिपाई चेतन शिरोळकर यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या बातमीनुसार वर नमुद घरफोडी चोरीच्या गुन्हयात दोन अल्पवयीन मुले असल्याचे व ते रतन सायकल मार्ट याठिकाणी आलेले आहेत. अशी बातमी मिळताच मा.पोलीस उप आयुक्त सो. स्वप्ना गोरे मॅडम, सहाय्यक पोलीस आयुक्त सो. श्री.सुधाकर यादव यांचे मार्गदर्शनाखाली विश्रामबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.दादासाहेब चुडाप्पा यांचे अधिपत्याखाली तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक श्री. विजय जाधव, पोलीस हवालदार शरद वाकसे, अभय काळे, पोलीस नाईक बाबा दांगडे, धिरज पवार, पोलीस शिपाई चेतन शिरोळकर, प्रशांत शिंदे यांनी रतन सायकल मार्ट येथे सापळा रचुन वर नमुद गुन्हयांतील दोन विधी संघर्षग्रस्त बालकांना ताब्यांत घेवुन त्यांचेकडुन वर नमुद गुन्हयांतील चोरीस गेलेल्या मालापैकी १२,२१०/-रुपये रोख रक्कम व १२,०००/-रुपये किंमतीचा डी.व्ही.आर. असा एकुण २४,२१०/-रुपये किंमतीचा माल हस्तगत करुन वर नमुद घरफोडी चोरीचा गुन्हा ४८ तासांमध्ये उघडकीस आणुन उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे.

( दादासाहेब चुडाप्पा )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर
( अतिरिक्त कार्यभार )